१७ व्या वर्षात यशस्वी पदापर्ण करणारे साप्ताहिक..

# प्रगत भारत

सभासद,बातम्या विशेष मुलाखत व दररोजच्या वेब पोर्टल न्यूज www.pragatatbharat.com-९८६०८७७७८९

सभासद नोंदणी योजना सन २०२५ पिं.चिं.शहरचिखली,मोशी,देहू-आळंदी परिसरातील नागरिक/व्यावसायिक विशेष सुवर्ण संधी..मोफत तीन जाहिराती व एक भेटवस्तू!साप्ताहिक'प्रगत भारत'वृतपत्रकाची घरपोच व जवळच्या वृतपत्रक स्टॉल विक्रेते यांच्याकडे सभासद फॉर्म भरून दोनवर्षे सभासद द्धिवार्षिक १,२००/-बाराशे रूपये (सुवर्णसंधी योजना/भेटवस्तू) द्धिवार्षिक सुवर्णसंधी सभासद होणाऱ्यांना तीन जाहिराती साप्ताहिक प्रगत भारत वृतपत्रकामधून मोफत प्रकाशित करण्यात येईल. १)स्वत:च्या/संस्थेची व्यावसायाची(वर्धापनदिन)२)वाढदिवसाची३)नांदासौख्यभरे(लग्ननाचा) वाढदिवस तीन शुभेच्छा जाहिरात साईज 4 (w) x 6 (H) स्के.सें.मीं(कृष्ण धवल)पान क्र.२ व ३ वर असेल टिप:-सुवर्णसंधी योजना सभासद झालेल्यांना सभासदमुदतीनंतर भेटवस्तू दिली जाईल संपर्क:९८६०८७७७८९/७०५८९३९८७३

नियम व अटी लागू

• वर्ष:१७ •अंक.क्र.३१ • साप्ताहिक • मंगळवार दि.११ ते १७ फेब्रूवारी २०२५ • RNI/MAH/MRA/2008/25149 • RNP-PCE / पोस्ट/006/2024-2026 • पृष्ठे-४ • किंमत:२.००

# चिखली,कुदळवाडीत जमिनीवरील अतिक्रमण भुईसपाट..



## चिखली,कुदळवाडीत आजपर्यंत पावणे तीनशे एकर जमिनीवरील अतिक्रमण भुईसपाट..सलग तिसऱ्या दिवशी ६८२ बांधकामे निष्कासित

साप्ताहिक प्रगत भारत
दररोजच्या बातम्या व जाहिराती..
E-Peper web pragatbharat.com

**पिंपरी:**-चिखली येथील कुदळवाडी भागात आज सलग तिसऱ्या दिवशीही अतिक्रमण कारवाई करण्यात आली. ७७ एकर क्षेत्रामध्ये झालेल्या या कारवाईदरम्यान आज एकूण ६८२ बांधकामे निष्कासित करण्यात आली. शहरातील नियोजित विकास आरक्षणे आणि नागरिकांच्या सुविधांसाठी असलेल्या जागेवरील अनधिकृत पत्राशेड, कारखाने, गोदामे, भंगार दुकाने तसेच अनधिकृत बांधकामे हटविण्यासाठी ही कारवाई करण्यात येत असून यापुढेही ती चालू राहणार आहे.पिंपरी चिंचवड महापालिकेच्या बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग आणि क्षेत्रीय धडक कारवाई पथकांमार्फत करण्यात आलेल्या या कारवाईमध्ये आज ३३ लाख ५८ हजार १३० चौरस फूट बांधकामांवर निष्कासनाची कारवाई करण्यात आली. त्यामध्ये ६८२ बांधकामांचा समावेश होता. पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे आणि महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या या कारवाईमध्ये अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, उपआयुक्त मनोज लोणकर, विशेष अधिकारी किरण गायकवाड, क्षेत्रीय अधिकारी राजेश आगळे, सुचेता पानसरे, अमित पंडित, किशोर ननवरे, उमेश ढाकणे, अजिंक्य येळे, शितल वाकडे, श्रीकांत कोळप यांच्यासह कार्यकारी अभियंता, उपअभियंता, कनिष्ठ अभियंता सहभागी झाले होते. सह पोलीस आयुक्त शशिकांत महावरकर, अतिरिक्त पोलिस आयुक्त वसंत परदेशी यांच्या अधिपत्याखाली पोलीस उपआयुक्त स्वप्ना गोरे, डॉ. शिवाजी पवार,संदीप डोईफोडे, विवेक पाटील यांच्या नेतृत्वाखाली या परिसरात चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.या कारवाईमध्ये महापालिका अतिक्रमण धडक कारवाई पथकामधील ४ कार्यकारी अभियंते, १६ उपअभियंते,

### निष्कासनाची कारवाई करण्यात आलेला एकूण भूभाग..

**८ फेब्रुवारी ४२ एकर,९ फेब्रुवारी १५७ एकर,१० फेब्रुवारी ७७ एकर,एकूण २७६ एकर निष्कासित केलेली एकूण बांधकामे..८ फेब्रुवारी २२२९ फेब्रुवारी ६०७१० फेब्रुवारी ६८२ एकूण-१ हजार ५११ निष्कासित केलेल्या एकूण बांधकामांचे क्षेत्रफळ..८ फेब्रुवारी १८ लाख ३६ हजार चौरस फूट ९ फेब्रुवारी ६८ लाख ७८ हजार चौरस फूट १० फेब्रुवारी ३३ लाख ५८ हजार चौरस फूटएकूण १ कोटी २० लाख ७२ हजार चौरस फूट**

महाराष्ट्र सुरक्षा दलाचे १८० जवान, ६०० पोलीस आणि मजूर कर्मचारी सहभागी झाले होते. १६ पोकलेन, ८ जेसीबी, १ क्रेन आणि ४ कटर यांचा वापर निष्कासन कारवाईमध्ये करण्यात आला. शिवाय ३ अग्निशमन वाहने आणि २ रुग्णवाहिका देखील येथे तैनात करण्यात आल्या होत्या. महापालिका यंत्रणेसह पोलीस, वीज वितरण कंपनीचे अधिकारी कर्मचारी देखील सहभागी झाले होते.

२५ वर्षापासूनची यशस्वीची परंपरा.
विकास इन्फोटेक
चिखलीगावा मधील एकमेव MSCIT अधिकृत केंद्र
१०० टक्के JOB ORIENTED COMPUTER COURSES
* TALLY PRIME *GST
* AUTO CAD *WEB DESING
* TALLY PRIME *GST
*ADV.EXCEL *HARDWARE
*MSCIT *KLICK
शाखा-१.टाळगाव चिखली कमान शेजारी.२.तळवडे कमान शेजारी देहुआळंदी रोड पुणे
976447399/9762799070

# पिंपरी चिंचवड शहरामधील मुख्यमंत्री फडणवीसांच्या हस्ते पाचशे कोटींच्या विकासकामांच भूमीपूजन अन लोकार्पण

## पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या नवीन इमारतीचा भूमीपूजन सोहळा संपन्न

साप्ताहिक प्रगत भारत
दररोजच्या बातम्या व जाहिराती..
E-Peper web pragatbharat.com



**पिंपरी:-पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून माहितीचे संकलन करणारा सिटी हब उपक्रम आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून करण्यात येणाऱ्या होर्डिंग शोध आणि सर्वेक्षण प्रणाली सारखे उपक्रम नागरी हितासाठी उपयुक्त आहेत. पिंपरी चिंचवड शहराला आधुनिक शहर बनविण्यासाठी नागरी सुरक्षेच्या दृष्टीने राबविलेले लोककल्याणकारी प्रकल्प महत्वपुर्ण ठरतील, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने उभारण्यात आलेल्या विविध प्रकल्प आणि उपक्रमांचा भूमीपूजन,लोकार्पण समारंभ तसेच पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या नवीन इमारतीचा भूमीपूजन सोहळा जाधववाडी चिखली येथील एम एनजीएल पंपासमोर आयोजित करण्यात आला होता.

यावेळी महापालिकेच्या सुमारे ४८३.४७ कोटी रुपयांच्या उपक्रमांचे आणि प्रकल्पांचे भूमीपूजन,लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले,त्यावेळी ते बोलतहोते.यावेळी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील,गृह राज्यमंत्री योगेश कदम,आमदार अमित गोरखे, विजय शिवतारे,महेश लांडगे, अण्णा बनसोडे,शरद सोनवणे, शंकर जगताप,ज्ञानेश्वर कटके, बापूसाहेब पठारे,बाबाजी काळे,

माजी खासदार अमर साबळे, विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार,पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे,पोलीस महानिरीक्षक सुनिल फुलारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी,पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त डॉ.योगेश म्हसे,सह पोलीस आयुक्त शशिकांत महावरकर, अप्पर पोलीस आयुक्त वसंत परदेशी, पोलीस अधिक्षक पंकज देशमुख, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, चंद्रकांत इंदलकर यांच्यासह लोकप्रतिनिधी, पोलीस व प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी तसेच नागरिक उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, शहरात घडणाऱ्या आगीच्या घटनांकडे दुर्लक्ष करता येणार नाही.कॅलिफोर्नियामध्ये लागलेल्या आगीवर नियंत्रण मिळविताना अमेरिकेसारख्या विकसित देशाला प्रयत्नांची पराकाष्टा करावी लागली. पिंपरी चिंचवड शहर हे औद्योगिक नगर आहे अशा शहरात म हानगरपालिकेने सुरक्षिततेच्या दृष्टीने मध्यवर्ती अग्निशमन केंद्र व अग्निशमन प्रबोधिनी उभारण्याचा महत्वपुर्ण निर्णय घेतला असून ही बाब कौतुकास्पद आहे. तसेच महापालिकेच्या विविध सेवा नागरिकांपर्यंत अधिक प्रभावी पद्धतीने पुरवून नागरिक केंद्रित प्रशासन आणि प्रशासनामध्ये लोकाभिमुखता, पारदर्शकतेसह उत्तरदायी प्रशासन निर्माण करण्यास **सिटी हब फॉर डेका कम्युनिकेशन** उपक्रम महत्वपुर्ण ठरणार आहे. विविध शहरांमध्ये अनधिकृत जाहिरात फलक,होर्डिंग्सचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढले आहे.त्यावर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने उपाय म्हणून कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून सुरू केलेला होर्डिंग्स शोध आणि सर्वेक्षण प्रणाली महत्वपुर्ण ठरेल.यामुळे केवळ अधिकृत होर्डिंग्सवर जाहिराती लागल्या जातील आणि शहराचे विदृपीकरण होणार नाही. शहरातील अनधिकृत होर्डिंग कोणाचेही असो काढून टाका, त्यावर माझा फोटो अथवा नाव असले तरीही कारवाई थांबवू नका.देशाच्या विकासामध्ये महाराष्ट्राचे महत्वाचे योगदान आहे.तसेच महाराष्ट्राच्या विकासामध्ये पुणे, पिंपरी चिंचवड ही शहरे ग्रोथ इंजिन म्हणून काम करतात. या ठिकाणी उद्योगधंद्यांना पोषक वातावरण राहील याची दक्षता घेणे सर्वांची जबाबदारी आहे. या शहरांच्या औद्योगिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करण्यासाठी मोठमोठ्या कंपन्यांना आणले जाईल. ज्यामुळे रोजगार उपलब्ध होऊन शहराचा झपाट्याने विकास करण्यावर भर दिला जाईल. तसेच पिंपरी चिंचवड शहराला आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी आवश्यक जागा उपलब्ध करून दिली जाईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यावेळी म्हणाले.पिंपरी चिंचवड शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. २०५४ पर्यंत पुणे शहरापेक्षा पिंपरी चिंचवडची लोकसंख्या अधिक होणार आहे. त्याअनुषंगाने आगामी ५० वर्षे डोळ्यासमोर ठेऊन शहराचा सर्वांगीण विकास होण्यासाठी विविध प्रकल्पांची उभारणी करण्यात येत आहे. त्यामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून प्रशासकीय इमारतींची उभारणी करण्यावर भर दिला जात आहे. या प्रशासकीय इमारतींमध्ये जेव्हा नागरिक येतील तेव्हा त्यांना समाधान वाटावे आणि अधिकारी, कर्मचारी यांना त्याठिकाणी काम करताना उत्साह वाटायला हवा याची दक्षता घ्यावी असे उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले.

# राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून शिरीष महाराज मोरे यांच्या कुटुंबाला ३२ लाखांची मदत



**देहू:-(सा.प्रगत भारत)**संत तुकाराम महाराजांचे अंकरावे वंशज शिरीष महाराज मोरे यांनी आर्थिक विवंचनेतून काही दिवसापूर्वी आत्महत्या केली होती.त्यात त्यांनी सुसाईड नोट लिहीत कुणाला किती पैसे देणे बाकी आहेत,याचा उल्लेख केला होता.आता सांवेदनशील नेते म्हणून परिचित असणारे राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे मोरे कुटुंबियांच्या मदतीला धावून आले आहेत. त्यांनी मोरे कुटुंबाला ३२ लाख रुपये मदत केली आहे. शिंदे यांनी त्यांच्या वाढदिवसाच्या दिवसाचे औचित्य साधून हा निर्णय घेतला आहे. त्यामुळे मोरे कुटुंबला मोठा दिलासा जरी मिळाला असला तरी मुलगा गेल्याचे दुःख त्यांच्या मनात आहे.

एकनाथ शिंदे यांनी ३२ लाख रुपयांची मदत देण्याचा निर्णय घेतला असून आमदार विजय शिवतारे यांनी ही मदत पोहचवली आहे. शिवतारे यांनी ही मदत मोरे कुटुंबियांकडे सुपूर्त केली आहे. आत्महत्या कारण्याअगोदर मोरे महाराजांनी माझे कर्ज फेडण्यासाठी मित्रांनी माझ्या घराच्याना मदत करावी,असे आवाहन केले होते.त्यांच्याच आवाहनाला साद दिली आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मोरे कुटुंबाला आर्थिक विवंचनेतून बाहेर काढण्यासाठी मदतीचा हात पुढे केला आहे.जगद्गुरू संत तुकाराम महाराजांचे ११ वे वंशज प्रसिद्ध हभप शिरीष महाराज मोरे यांच्या आत्महत्येनंतर फक्त वारकरी संप्रदाय नाही संपूर्ण महाराष्ट्र हळहळला. आर्थिक अडचणीत शिरीष मोरे यांनी आपलं आयुष्य संपवलं,ही बाब एकनाथ शिंदेंना समजताच त्यांनी मोरे कुटुंबियांना ३२ लाख रुपयांची मदत देण्याचा निर्णय घेतला आहे.

# पाच वर्षात मावळचा पूर्ण कायापालट करणार':- आमदार सुनील शेळके



साप्ताहिक प्रगत भारत
बातम्या व जाहिराती..
E-Peper web pragatbharat.com

**मावळ:-(सा.प्रगत भारत)** पुढील पाच वर्षात तालुक्यातील शिल्लक राहिलेली विकासकामे मार्गी लावू व तालुक्याचा पूर्ण कायापालट करू,अशी ग्वाही देखील मावळच्या जनतेला आमदार शेळके बोलताना त्यांनी, दिली.

वडगाव मावळ येथे महायुती व मित्र पक्षांच्या वतीने आभार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी खासदार श्रीरंग बारणे,आरपीआयचे(आठवले गट)प्रदेश सचिव सूर्यकांत वाघमारे,एसआरपी पक्षाचे अध्यक्ष रमेश साळवे,राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष गणेश खांडगे,शिवसेना तालुका प्रमुख राजेश खांडभोर, मावळ भाजपा प्रभारी भास्करराव म्हाळसकर,तळेगाव शहर भाजपा अध्यक्ष संतोष दाभाडे, लोणावळा शहरातील भाजपा नेते देविदास कडू,गणेश ढोरे,विठ्ठलराव शिंदे, शरद हुलावळे,साहेबराव कारके,दिपाली गराडे आदी मान्यवर, पदाधिकारी,कार्यकर्ते उपस्थित होते.खासदार श्रीरंग बारणे यांनीही आपले मनोगत व्यक्त करीत,राज्यात महायुतीचे कणखर सरकार आले असून महायुतीवर विश्वास ठेवून आम्ही मावळचा विकास करणार आहोत. यासाठी आपण सर्वांनी मनापासून भक्कमपणे महायुतीच्या पाठीशी उभे राहून साथ द्यावीयांनी केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविकराष्ट्रवादीचे तालुका अध्यक्ष गणेश खांडगे सूत्रसंचालन राज खांडभोर यांनी केले. किशोर सातकर यांनी आभार मानले.

# प्रतिभा कॉलेज ऑफ कॉमर्स अँड कॉम्प्युटर स्टडीजला सायबर सुरक्षा अभियान उपक्रमात सर्वोत्कृष्ट राष्ट्रीय पुरस्कार



साप्ताहिक प्रगत भारत
दररोजच्या बातम्या व जाहिराती..
E-Peper web pragatbharat.com

**चिंचवड :** चिंचवड येथील कमला एज्युकेशन सोसायटी चे संस्थापक सचिव डॉ. दीपक शहा यांच्या मार्गदर्शनाखाली प्रतिभा कॉलेज ऑफ कॉमर्स अँड कॉम्प्युटर स्टडीज व क्विल हील फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा हा जनजागृतीचा उपक्रम गेले दोन वर्षापासून राबविण्यात येत आहे. या उपक्रमात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षा बाबत प्रशिक्षण देण्यात आले. त्यांनी पिंपरी चिंचवड शहर, रुपीनगर, तळवडे, लोणावळा परिसरातील शाळा, महाविद्यालये, भाजी मंडई, नागरी वस्ती, बस स्थानके येथे प्रत्यक्ष जाऊन सायबर सुरक्षा बाबत मार्गदर्शन करून नागरिक, विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती केली. या कार्याची दखल घेत, क्विक हिल फाउंडेशनच्या वतीने पुणे येथील आयोजित कार्यक्रमात त्यांना आठ श्रेणीपैकी पाच श्रेणीमध्ये सर्वाधीक पुरस्कार महाविद्यालयाने पटकाविले. त्यात प्रतिभा कॉलेज ऑफ कॉमर्स अँड कॉम्प्युटर स्टडीज या महाविद्यालयाला सर्वोत्कृष्ट सायबर सुरक्षे करिता सायबर शिक्षण हा राष्ट्रीय पुरस्कार राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते कमला एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक, सचिव डॉ. दीपक शहा यांनी स्वीकारला. तसेच शिक्षक श्रेणीत महाविद्यालयातील डॉ. हर्षिता वाच्छांनी, प्रा. सुप्रिया गायकवाड, प्रा. उज्वला फलक सर्वोत्कृष्ट राष्ट्रपती विजेता पुरस्कार विद्यार्थी दिपू सिंग, सर्वोत्कृष्ट पी.आर. मीडिया डायरेक्टर फर्स्ट विद्यार्थिनी बतुल परवाला. सर्वोत्कृष्ट सायबर वॉरियर्स पहिली धावपटू विद्यार्थिनी श्रावणी सावंत, ओम जगताप यांनाही राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा अवार्ड्स या कार्यक्रमात राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या समवेत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ प्रकाश महानवर, सायबर चे उपमहा निरीक्षक संजय शिंत्रे. क्विक हिल फाउंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा काटकर, क्विक हिल व्यवस्थापकीय संचालक डॉ कैलास काटकर सहव्यवस्थापकीय संचालक डॉ.संजय काटकर, मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल साळवी समवेत विविध महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थी या कार्यक्रमास उपस्थित होतेप्रतिभा महाविद्यालयाला मिळालेल्या दैदीप्यमान यशाबद्दल महाविद्यालयात आनंदोत्सव साजरा करून प्राचार्य डॉ.ए.के.वाळुंज, उपप्राचार्या डॉ. क्षितिजा गांधी, मुख्य प्रशासकीय अधिकारी डॉ. राजेंद्र कांकरिया समावेत प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

# खासदार श्रीरंग बारणे यांच्या वाढदिवसानिमित्त शनिवारी थेरगाव येथे भव्य रोजगार मेळावा




**पिंपरी:-**मावळ लोकसभेचे खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांच्या वाढदिवसानिमित्त युवासेनेच्या वतीने थेरगाव येथे भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवार, दि.१५ फेब्रुवारी २०२५ रोजी, सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत मोरया बँक्केट हॉल, दत्तनगर, थेरगाव येथे हा मेळावा आयोजित होणार असल्याची माहिती पश्चिम महाराष्ट्राचे युवासेना सचिव विश्वजीत बारणे यांनी दिली आहे.विश्वजीत बारणे यांनी म्हटले आहे की, देशाचे उज्ज्वल भविष्य हे आजच्या तरुणांच्या हातात आहे. त्यांना देशाच्या प्रगतीत योगदान देण्यासाठी रोजगाराची संधी उपलब्ध करून देणं अत्यंत महत्त्वाचं आहे. याच दृष्टिकोनातून व मावळ लोकसभेचे खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधत युवासेनेच्या वतीने हा भव्य रोजगार मेळावा आयोजित करण्यात येत आहे.या रोजगार मेळाव्यात महाराष्ट्रातील ५० राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नामांकित कंपन्यांचा सहभाग असणार आहे. यावेळी ५ हजाराहून अधिक तरुण-तरुणींना रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे. या मेळाव्यात पाचवी ते पदवीधर पर्यंतचे शिक्षण असणाऱ्यांना तरुणांना सहभागी होता येणार आहे. त्याचप्रमाणे यावेळी निवड झालेल्या उमेदवारांना तात्काळ नियुक्तीपत्र देण्यात येणार आहे. तरी मावळ लोकसभा मतदारसंघातील सर्व सुशिक्षित तरुण तरुणींनी या रोजगार मेळाव्यात सहभागी होऊन सुवर्णसंधीचा लाभ घेत आपल्या उज्ज्वल भविष्याची सुरुवात करावी असे आवाहन विश्वजीत बारणे यांनी केले आहे.

# संत तुकाराम महाराजांचे वंशज शिरीष मोरे महाराज यांची गळफास घेत आत्महत्या

साप्ताहिक प्रगत भारत
दररोजच्या बातम्या व जाहिराती..
E-Peper web pragatbharat.com




**पिंपरी:-**संत तुकाराम महाराजांचे अकरावे वंशज शिरीष मोरे महाराज (वय ३१) यांनी राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे.आर्थिक बाबतीतुन हा टोकाचा निर्णय घेतल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी वर्तवला आहे. त्यांच्या अचानक जाण्याने संपूर्ण देहू गावावर शोककळा पसरली असून, सामाजिक आणि धार्मिक वर्तुळात हळहळ व्यक्त केली जात आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शिरीष मोरे महाराज हे मंगळवारी रात्री आपल्या खोलीत विश्रांतीसाठी गेल्यानंतर सकाळी साडेआठपर्यंत बाहेर आले नव्हते. घरातील सदस्यांनी त्यांना आवाज दिला, दरवाजा वाजवला,पण प्रतिसाद न मिळाल्याने दरवाजा तोडण्यात आला. आत प्रवेश केल्यानंतर त्यांनी छताच्या पंख्याच्या हुकाला उपरण्याने गळफास घेतल्याचे निदर्शनास आले.प्राथमिक तपासात, शिरीष महाराज यांनी आत्महत्येपूर्वी एक चिठ्ठी लिहून ठेवल्याचे आढळून आले आहे. पोलिसांनी सदर चिठ्ठी ताब्यात घेतली असून, त्याचा तपास सुरू आहे. देहूरोड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक विक्रम बनसोडे यांनी सांगितले की, ''आर्थिक विवंचनेतून ही आत्महत्या झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे, मात्र अधिक चौकशी करून खरी कारणे समोर आणली जातील.''

# मोशी येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते धनश्री हॉस्पिटलचे उदघाटन

साप्ताहिक प्रगत भारत
दररोजच्या बातम्या व जाहिराती..
E-Peper web pragatbharat.com



**पिंपरी:-**आधुनिक तंत्रज्ञानातील रोबोटिक्स व कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर आरोग्य सेवेसाठी उपयुक्त आहे. योग्य निदान होऊन अनेक गंभीर आजारांवर,गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया करता येतात.रोबोटिक्स तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या अचूक वापरामुळे रुग्णाला जीवदान मिळते. महाराष्ट्र शासन जवळपास तेराशे आरोग्यसेवा नागरिकांना देत आहे; तर केंद्र सरकारच्या १८०० आरोग्य सेवा दिल्या जातात. केंद्राप्रमाणेच अधिकाधिक सेवा देण्याचा प्रयत्न महाराष्ट्र सरकार करत आहे. या सेवा देण्यामध्ये खाजगी रुग्णालय महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. धनश्री हॉस्पिटलने या सेवा देण्याचा प्रयत्न करावा, असे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले.

डॉ.पटवर्धन यांनी मोशी येथे उभारलेल्या अत्याधुनिक १०१ बेडच्या धनश्री हॉस्पिटलचे उदघाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार,जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील,आमदार महेश लांडगे, शंकर जगताप,अण्णा बनसोडे, शरद सोनवणे,विधानपरिषद आमदार अमित गोरखे,पिंपरी चिंचवड शहर भाजपा कार्याध्यक्ष शत्रुघ्न काटे, माजी महापौर मंगला कदम,पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त शेखर सिंह,पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, धनश्री हॉस्पिटलचे संचालक डॉ.राजीव पटवर्धन,डॉ.अपूर्व पटवर्धन,डॉ. सलोनी पटवर्धन, विजय रासकर,स्वाती रासकर,वैष्णवी रासकर,डॉ. अश्विन भालेराव,डॉ. कांचन दुरूगकर-भालेराव आदी उपस्थित होते

.आरोग्यसेवा मजबूत असेल तर देश प्रगती करू शकतो. राज्य सरकार आरोग्य सेवा सक्षम करण्यासाठी भर देत असून रूग्णांसाठी विविध योजना सुरू केलेल्या आहेत. सरकारी रुग्णालयांप्रमाणे खाजगी रुग्णालयांच्या माध्यमातून आरोग्य सेवेच्या सरकारी योजना राबविल्या तर या योजनांना अधिक बळ मिळू शकते, असे उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले.उदघाटन समारंभास वैद्यकीय, औद्योगिक, व्यवसायिक, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. डॉ. सलोनी पटवर्धन यांनी प्रास्ताविक केले. डॉ. राजीव पटवर्धन यांनी आभार मानले.

# यंदाच्या अर्थसंकल्पात मालमत्ता करात कोणतीही वाढ नाही ?

साप्ताहिक प्रगत भारत
दररोजच्या बातम्या व जाहिराती..
E-Peper web pragatbharat.com

**पिंपरी:-**आगामी (२०२५-२६) आर्थिक वर्षात शहरातील निवासी, बिगरनिवासी, औद्योगिक, मिश्र आणि मोकळ्या जागेच्या मालमत्ता करात कोणतीही वाढ करण्यात येणार नाही. चालू आर्थिक वर्षातीलच कर पुढील वर्षी कायम ठेवले जाणार आहेत. त्यामुळे प्रशासकीय राजवटीत शहरवासीयांना दिलासा मिळाला आहे. दरम्यान, यापूर्वी २०१३-१४ मध्ये मालमत्ता करात वाढ केली होती. त्यामुळे सलग अकराव्या वर्षी कोणतीही करवाढ करण्यात येणार नाही.पिंपरी-चिंचवड शहरातील निवासी व बिगरनिवासी अशा एकूण सहा लाख ३५ हजार मालमत्तांची नोंद महापालिकेकडे आहे. मालमत्ता करात वाढ करण्यासाठी २० फेबुवारीपूर्वी त्या प्रस्तावाला सर्वसाधारण सभेची मान्यता घ्यावी लागते. त्यानुसार कर संकलन विभागाने करवाढ न करण्याबाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर ठेवला होता. त्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे प्रशासकीय राजवटीत मालमत्ताकरात यंदाही कोणतीही करवाढ केलेली नाही.एक ते बारा हजार रुपये कर योग्यमूल्य असलेल्या निवासी मालमत्तांना १३ आणि बिगरनिवासी मालमत्तांना १४ टक्के सामान्यकर दर आहे. बारा हजार एक ते ३० हजार रुपये करयोग्यमूल्य असलेल्या निवासी मालमत्तांना १६ आणि बिगरनिवासी मालमत्तांना १७ टक्के सामान्यकर दर आहे. तीस हजार एक व त्यापुढील करयोग्यमूल्य असलेल्या निवासी व बिगरनिवासी मालमत्तांना २४ टक्के सामान्यकर लावला जातो. साफसफाईकर निवासी मालमत्तांना पाच टक्के व बिगरनिवासी मालमत्तांना सहा टक्के आहे. अग्निशामक कर निवासी व बिगरनिवासी मालमत्तांना दोन टक्के आहे. महापालिका शिक्षण कर निवासी मालमत्तांना चार टक्के आणि बिगरनिवासी मालत्ताना पाच टक्के आहे. मलप्रवाह सुविधा लाभ कर निवासी व बिगरनिवासीसाठी पाच टक्के, पाणीपुरवठा लाभ कर निवासी मालमत्तांना चार टक्के व बिगरनिवासी मालमत्तांना पाच टक्के आहे. रस्ता कर निवासी मालमत्तांना दोन टक्के व बिगरनिवासी मालमत्तांना तीन टक्के आहे. तर,वृक्ष कर एक टक्का आहे.मॉल, हॉटेलचालकांनाही दिलासा..मॉल,लॉजिंग बोर्डिंग,मंगल कार्यालय, सभागृह,रुग्णालय,हॉटेल्स,पाहारगृह, रेस्टॉरंट या मालमत्तांना दोन टक्के विशेष साफसफाई कर आहे. नाट्यगृह, सिनेमागृह, मॅल्टिप्लेक्स,नाटक, सर्कस,संगीत कार्यक्रम,कुस्त्या,मुष्टियुद्ध यांना प्रत्येक खेळास ५० रुपये ते ३५० रुपये करमणूक कर आहे.सवलत कायम..आगाऊ व ऑनलाइन देयक भरणाऱ्यांना पूर्वीप्रमाणे सामान्य करात सवलत देण्यात येणार आहे. महिला, अपंग,स्वातंत्र्यसैनिक किंवा त्यांच्या पत्नी,हरित इमारत, कंपोस्टींग, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प, झिरो वेस्ट यंत्रणा असलेल्या निवासी मालमत्ता,शैक्षणिक इमारती, इलेक्ट्रिक वाहनांसाठी चार्जिंग स्थानक उभारल्यास सवलत कायम असणार आहे.आगामी आर्थिक वर्षात करवाढ केली जाणार नाही. विनानोंदीत,वाढीव, कर कक्षेच्या बाहेर असलेल्या मालमत्तांचे सर्वेक्षण सुरू आहे. नोंदणी नसलेल्या अडीच लाख नवीन मालमत्ता आढळून आल्या आहेत. या सर्व मालमत्ता कर कक्षेत आल्यानंतरच करवाढीचा विचार केला जाईल,असे कर आकारणी व कर संकलन विभागाचे सहायक आयुक्त अविनाश शिंदे यांनी सांगितले.

# शालवी चासकरचा बुद्धिबळ स्पर्धेत प्रथम क्रमांक.

## भाजपा शहर कार्यकारी अध्यक्ष शत्रुघ्न काटे यांच्या हस्ते तिचा सन्मान

**पिंपरी:-**पुणे जिल्हा बुद्धिबळ सर्कल आयोजित ''पीडीसीसी'' च्या निवड चाचणी बुद्धिबळ स्पर्धेत नऊ आणि अकरा वर्षाखालील मुलींच्या गटात पिंपळे सौदागरची कन्या शालवी चासकरने प्रथम क्रमांक पटकविल्याबद्दल भाजप पिंपरी चिंचवड शहर जिल्हा कार्यकारी अध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी ट्रॉफी देऊन सन्मानित केले. पिंपळे सौदागर मधील लहान मुले तसेच युवा वर्ग क्रीडा प्रकारात करत असलेली प्रगती ही एक खूप समाधानाची बाब आहे. त्यांच्या खेळाडू वृत्तीला अजून चालना देण्यासाठी एक लोकसेवक या नात्याने सदैव प्रयत्नशील राहणार आहे. तसेच प्रभागातील विविध खेळात पारंगत असलेल्या खेळाडूंना




पुढील वाटचाल सोयीस्कर व्हावी यासाठी पुढाकार घेणार आहे, असे सांगत शत्रुघ्न काटे यांनी शालवी चासकर हीचे कौतुक आणि तिच्या पाठीशी खंबीरपणे उभ्या राहणाऱ्या तिच्या आई वडीलांचे विशेष अभिनंदन केले.आपल्या मुलांना त्यांच्या आवडत्या खेळात सहभाग घेण्यापासून मज्जाव न करता त्यांना आपला पूर्ण पाठिंबा देऊन त्यांच मनोधर्य उंचावणे हीच त्यांच्या यशाची खरी गुरुकिल्ली असते, असेही ते म्हणाले.